
# वनसंरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर वनवृत्त

## वन व्यवस्थापनेमध्ये सुधारणा व भविष्यातील वन व्यवस्थापनेमधील आव्हाने यासंबंधी अभ्यास गटांची स्थापना करणे

विषयः- मानव व वन्यजीव संघर्ष व त्याबाबत उपाययोजना




## छत्रपती संभाजीनगर (प्रादेशिक) वनवृत्त

- एकुण जिल्हे संख्या-८
- एकुण वन विभाग-०५ (छत्रपती संभाजीनगर, नांदेड, बीड, धाराशिव व हिंगोली)
- एकुण भौगोलीक क्षेत्र - ६४,७२८ चौ.की.मी.
- एकुण वनक्षेत्र- ३१२१.२५ चौ.की.मी.
- वनक्षेत्राची टक्केवारी- ४.८२ टक्के

- छत्रपती संभाजीनगर वनवृत्तात प्रामुख्याने मानव वन्यजीव संघर्षामध्ये माकड/वानरांमुळे होणारा संघर्ष इतर वन्यप्राण्यांच्या तुलनेत जास्त प्रमाणात आहे.
- **मानव वन्यजीव संघर्षाचे स्वरुप-**

- माकड/वानर माणसांवर धावून येते, ओरबाडते किंवा चावा घेते.
- माणसांच्या हातातील साहित्य हिसकावते, घरात घुसून अन्नपदार्थ-फळे आदि वस्तू पळविते.
- गावातील मंदिरे, चावडी व शाळा अशा सार्वजनिक ठिकाणी हैदोस घालतो.
- शेतात फळझाडांची, पिकांची नुकसानी करते.
- विविध पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांना त्रास देतो.



**समस्येची कारणे:-**

**१. माकड/वानर माणसांवर धावून येते, ओरबाडते किंवा चावा घेते.**

- एका ६० ते ७० माकडांच्या टोळीला एकटोळी /गटप्रमुख असतो. ज्यावेळी दुसरी माकडांची टोळी त्यागावामध्ये येते त्यावेळी दुस-या टोळीचा टोळी/ गटप्रमुख आपले अस्तीत्व दाखविणेसाठी व अस्तीत्वातील टोळीचा टोळी प्रमुख आपले अस्तीत्व टिकवण्यासाठी एकमेकांशी भाडंतात. अशा वेळी १-२ माकडे पिसळण्याची शक्यता असते. अशावेळी या माकडांपासुन स्थानिक लोकांना त्रास होतो.
- सदर माकडे प्रजनन कालावधीत असताना, त्यांना स्थानिक लोकांकडून त्रास दिला गेल्यास ते अशावेळी प्रतिकार करतात किंवा लोकांवर हल्ला करुन उपद्रव देऊ शकतात.



**समस्येची कारणे:-**

**२. माणसांच्या हातातील साहित्य हिसकावते, घरात घुसून अन्नपदार्थ-फळे,वाळवण आदि पळविते.**

- एका माकडाच्या टोळीत अदांजे ६० ते ७० माकडे असतात. पीक कापणीच्या हंगामानंतर ही माकडे गावात आल्यानंतर गावातील लोकांनी उडीद, मुग, भुईमूग तसेच कुरडई, पापड, ईत्यादीचे वाळवन उन्हात घातल्यानंतर गावातील माकडे खाद्यवस्तु खाण्यांचा प्रयत्न करतात. अशा वेळी माकडांना विरोध केल्यास ते संबंधीतावर हल्ला करण्याचा प्रयत्न करतात. सदरची माकडे खाद्य मिळविण्यासाठी गावातील लोकांच्या घरावर उडया मारणे, त्या परिसरातील वस्तुंची तोडफोड करणे, शेतात जाणा-या महिलांच्या डोक्यावरील शिदोरी हिसाकाऊन घेणे असे प्रकार करुन नागरीकांना त्रास देतात.





**समस्येची कारणे:-**

**३. गावातील मंदिरे, चावडी व शाळा अशा सार्वजनिक ठिकाणी हैदोस घालतो.**

- गावात असलेले मंदिरामध्ये देवासाठी वाहण्यात आलेली फळे, नैवद्य इ.खाण्यासाठी मंदिरामध्ये येतात.
- शाळेतील मध्यान्न भोजन योजनेतील अन्न हिसाकाऊन घेणे असे प्रकार करुन विद्यार्थ्यांना त्रास देतात.






**समस्येची कारणे:-**

**४. शेतात फळझाडांची, पिकांची नुकसानी करते.**

➢ या वनवृत्ताच्या कार्यक्षेत्रातील क्षेत्र हे प्रामुख्याने अवर्षनग्रस्त/ कमी पावसाचे असल्यामुळे सुमारे ७०% क्षेत्रात खरीप हंगामात कपाशी, मका, सोयाबीन, तुर, मुग, उडद, कांदा व रब्बी हगांमा मधील गहु, हरभरा, भुईमुग, कांदा ई पिके घेतली जातात. उर्वरीत ३० % क्षेत्रात ज्या ठिकाणी पाण्याची सोय उपलब्ध आहे त्या ठिकाणी मिरची, उस, मोसंबी, केळी, ई पीके घेतली जातात. सदरच्या पिकांची कापणी होण्यापूर्वी माकडे ती पिके खाण्यासाठी नुकसानी करतात.











**समस्येची कारणे:-**

**५. विविध पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांना त्रास देतो.**

- या वनवृत्ताच्या कार्यक्षेत्रात पर्यटन स्थळे जसे की; अंजिठा लेणी, औरंगाबाद लेणी, वेरुळ लेणी व धार्मीक स्थळे जसे की; घृष्णेश्वर, भद्रा मारोती मंदीर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, माहुरची देवी, तुळजापूर, रामलिंग मंदीर इ. स्थळांची संख्या सुध्दा तुलनेत जास्त असल्याने माकडांचा प्रादुर्भाव या ठिकाणी मोठया प्रमाणावर दिसून येतो.
- सदरची माकडे पर्यटनाचा हंगाम कमी झाल्यानंतर तसेच सणासुदीचे दिवस संपल्यानतंर त्यांना पर्यटक व भाविक यांच्याकडून मिळणारे खाद्य कमी झाल्यानंतर ते खाद्याच्या शोधात या स्थळांच्या जवळ पासच्या गावात जाऊन लोकांना त्रास देतात.







# मानव-वन्यजीव संघर्ष उपाययोजना

**सन २०२३ पूर्वीची स्थिती:-**

- वानर/माकडाद्वारे नागरी वस्ती/शेतामध्ये टोळीने धुमाकूळ घालून शेती/पिकांचे नुकसान करित असल्याने गावकरी, शेतकरी व स्थानिक प्रतिनिधीच्या तक्रारी किंवा अर्ज वनपरिक्षेत्र कार्यालयास प्राप्त होत होते.
- मानव वन्यजीव संघर्ष कमी करणेसाठी माकड/वानरांना पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी श्री.समाधान गिरी रा.अंभई जि.छत्रपती संभाजीनगर या एकमेव व्यक्तीला अनुभव असल्याने ज्या गावात माकडे/वानर त्रास देत आहे त्या ठिकाणी त्यांचे मार्फत माकडे पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येत होते.
- त्यासाठी त्यांना प्रति माकड रु.४००/- दर निश्चित करण्यात आला होता.
- सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत माकड/वानरांना पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी श्री.समाधान गिरी यांना रु.६५.२४ लक्ष रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

**माहे ऑगस्ट-२०२३ नंतरची स्थिती:-**

- माहे ऑगस्ट-२०२३ पर्यंत छत्रपती संभाजीनगर वनवृत्तात माकड/वानरांद्वारे मानव वन्यजीव संघर्ष निर्माण झाल्यास त्यावर उपाययोजना म्हणून श्री.समाधान गिरी यांचेवर अंवलबित्व होते.
- समस्यांचे गांर्भीय लक्षात घेऊन वनसंरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर यांनी छत्रपती संभाजीनगर व हिंगोली वन विभागातील सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी यांची दिनांक २८.०९.२०२३ रोजी माकड पकडण्याचे प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन करण्यात आले.
- सर्व कर्मचा-यांनी कोणत्याही गावात/शाळेत/शेतात माकड उपद्रव करीत असल्याची तक्रार प्राप्त होताच प्रथमत: त्या माकडाचे त्या गावात येण्याची वेळ, तेथे आल्यानंतर माकडं नेमके काय करतात, काय खातात, कसे वागतात, कधी जंगलात जातात या सर्व बाबींचा बारकाईने अभ्यास करणे.
- त्यानंतर अभ्यासाअंती माकड/वानरांना पिंज-यात कसे बंद करायचे आणि जंगलात सुखरुप कसे पाठवायचे याबाबत विविध व्हिडीओच्या माध्यामातून सर्व कर्मचा-यांना मार्गदर्शन करण्यात आले.
- परिणामी कर्मचा-यांनी ज्या-ज्या ठिकाणी माकडांची समस्या आहे त्या-त्या ठिकाणी या पध्दतीचा अवलंब केला आणि आपणही माकडांना पकडून सुरक्षितस्थळी सोडू शकतो याबाबत कर्मचा-यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झालेला आहे.

# माकड/वानरे पकडण्यासाठीचे पिंजरे:-

**माकड पकडण्याचा पिंजरा-**
लांबी-५ फुट
रुंदी-४ फुट
उंची-४ फुट
गेट-४२ इंच रुंदी व 4 फुट उंची






**रॅम्प पिंजरा-**
लांबी-७ फुट
रुंदी-४२ इंच
उंची-२ फुट

**वाहतूक पिंजरा-**
लांबी-७ फुट
रुंदी-४ फुट
उंची-४ फुट
गेट-४२ इंच रुंदी व 4 फुट उंची



**परिणाम:-**

**अ) शासनाची निधी बचत-**

सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत माकड/वानर पकडणेकामी शासनाचे रु.६५.२४ लक्ष अनुदान खर्ची पडले. सध्या वन विभागाचे कर्मचारी माकड/वानर यांना पकडून सुरक्षित स्थळी हलवत असल्याने शासनास वेगळ्याने कोणत्याही प्रकारच्या शासकीय अनुदानाची आवश्यकता भासत नाही. एकूणच शासन खर्चात बचत झालेली आहे. व भविष्यात सुद्धा ही बचत होणार आहे.

**आ) वनविभागाचे सक्षमीकरण झाले-**

सन २०१८-१९ ते सन २०२२-२३ पर्यंत माकड/वानर पकडण्यासाठी श्री.समाधान गिरी यांचे अवलंबून रहावे लागत होते. क्षेत्रीय कर्मचारीच या कामात सक्षम प्रशिक्षित झाल्याने त्यांचेवरील परावलंबित्व राहिले नाही, तर कर्मचारी सदर समस्या हाताळण्यात सक्षम बनले.

**इ) जनसामान्यांच्या रोषाला वन विभागाला सामोरे जावे लागत नाही-**

माकड/वानर ज्या क्षेत्रात त्रास देत आहेत, त्या ठिकाणाची तक्रार प्राप्त झाल्याबरोबर क्षेत्रीय कर्मचारी विनाविलंब घटनास्थळी पोहचुन सदर समस्या सोडवत आहेत. तत्पर सेवा दिल्याने जनसामान्यांच्या रोषाला वन विभागाला सामोरे जावे लागत नाही.

**ई) मानव-वन्यजीव संघर्ष कमी-**

सद्यस्थितीत वानर/माकडाद्वारे नागरी वस्ती/शेतामध्ये टोळीने धुमाकूळ घालून शेती/पिकांचे नुकसान करण्यावर पुर्णत: नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. तसेच सद्यस्थितीत मानव व वन्यप्राणी संघर्ष देखील अत्यंत कमी झाला आहे. शेतातील पिके, फळबागा, मंदिरे, घरे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत नाही. त्यामुळे शेतक-यांना सुद्धा त्रास सहन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

# छत्रपती संभाजीनगर वनविभागामार्फत माकड/वानरांना पकडण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही.




MH-21
X-7963
EXTRA
Samsung Quad Camera
Shot with Mr.Ghuge


Latitude: 19°37'23"
Longitude: 76°0'40"
Elevation: 452.25±100 m
Accuracy: 18.8 m
Time: 15-10-2023 15:19
Note: मौजे - पानेवाडी ता. घनसावंगी.
Powered by NoteCam


Latitude: 19°37'23"
Longitude: 76°0'39"
Altitude: 381.2±83 m
Accuracy: 173.4 m
Time: 15-10-2023 15:18
Note: मौजे - पानेवाडी ता. घनसावंगी.
Powered by NoteCam

# हिंगोली वनविभागामार्फत माकड/वानरांना पकडण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही.




अक्षांश: 19.912157
रेखांश: 76.950685
बढती: 536.35±9 m
अचूकता: 6.3 m
वेळ: ३०.०७.२०२३ ०७:२०
टीप: ताकतोडा येथील वानरे पकडताना
Powered by NoteCam


अक्षांश: 19.82748
रेखांश: 77.004042
उंची: 429.37±18 m
अचूकता: 16.4 m
वेळ: २६.०७.२०२३ ०६:४७
टीप: जवळा बुद्रुक येथील वानरे पकडताना
Powered by NoteCam



अक्षांश: 20.571372
रेखांश: 76.344027
उंची: 484.29±11 m
अचूकता: 7.2 m
वेळ: २६.०७.२०२३ ११:५३
टीप: जवळा बुद्रुक येथील वानरे जंगलात सोडताना
Powered by NoteCam


THANK YOU!

| अ क्र | वनपरिक्षेत्र | गावांची संख्या | पकडण्यात आलेल्या माकडांचा कालावधी | माकडां-ची संख्या | प्रति वानर दर | माकडे पकडणे साठी एकुण रक्कम | गाड्यांच्या फे-या | प्रति फेरी वाहन भाडे | एकुण रक्कम | एकदंर एकुण रक्कम | गावात शिल्लक माकडांची अंदाजे संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैजापूर | १२ | २०२१ ते २०२३ | २७१ | ४०० | १०८४०० | १३ | ६००० | ७८००० | १८६४०० | २०० |
| २ | नागद | ८ | २०२१ ते २०२२ | १६६ | ४०० | ६६४०० | ८ | ६००० | ४८००० | ११४४०० | २०० |
| ३ | खुलताबाद | २ | सन २०२२ | ५५ | ४०० | २२००० | २ | ६००० | १२००० | ३४००० | ६९१६ |
| ४ | सोयगांव | २ | २०२२ ते २०२३ | १५५ | ४०० | ६२००० | ४ | ६००० | २४००० | ८६००० | १०० |
| ५ | अंजिठा | १८ | २०२० ते २०२३ | ७६२ | ४०० | ३०४८०० | २० | ६००० | १२०००० | ४२४८०० | ९०० |
| ६ | जालना दक्षिण | १३ | २०२२ ते २०२३ | ८३१ | ४०० | ३३१६०० | १४ | ६००० | ८४००० | ४१५६०० | ३००० |
| ७ | सिल्लोड | ३२ | २०२० ते २०२३ | १३८९ | ४०० | ५५५६०० | ३६ | ६००० | २१६००० | ७७१६०० | १२०० |
| ८ | जालना उत्तर | २५ | २०२१ ते २०२३ | ८८४ | ४०० | ३५३६०० | २५ | ६००० | १५०००० | ५०३६०० | ४०० |
| **एकुण छत्रपती संभाजीनगर विभाग** | | **११२** | -- | **४५१३** | **४००** | **१८०४४००** | **१२२** | **६०००** | **७३२०००** | **२५३६४००** | **१२९१६** |
| १ | सेनगांव | ७ | सन २०२२ | ७१७ | ४०० | २८६८०० | १० | २०००० | २००००० | ४८६८०० | ५००० |
| **एकुण हिंगोली वन विभाग** | | **७** | -- | **७१७** | **४००** | **२८६८००** | **१०** | **२००००** | **२०००००** | **४८६८००** | **५०००** |
| **वनवृत्त एकुण** | | **११९** | **२०२० ते २०२३** | **५२३०** | **४००** | **२०९१२००** | **१३२** | -- | **९३२०००** | **३०२३२००** | **१७९१६** |